# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल केलेले द्वितीय अपिल क्र.रामाआ नाशिक/द्वितीय अपिल क्र.४०७६/२०२३/जळगांव मधील शास्तीचे प्रकरण**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री.भगवान जगन्नाथ सोनवणे,<br>रा.मु.पो.कुंझर,<br>ता.चाळीसगांव, जि.जळगांव. | ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत कार्यालय, कुंझर.<br>ता.चाळीसगांव, जि.जळगांव. | गटविकास अधिकारी,<br>पंचायत समिती, चाळीसगांव.<br>ता.चाळीसगांव, जि.जळगांव. |

**विवेचन**

उपरोक्त द्वितीय अपिल संदर्भात अपिलार्थी यांनी दिनांक १०/१२/२०२२ रोजीच्या माहिती अर्जान्वये दि.०१/१०/२०२० ते दि.१०/१२/२०२२ या कालावधीत १५ वा वित्त आयोगाचे झालेल्या कामाचा तपशिल, ग्रामपंचायतचे वार्षिक (१५ वा वित्त आयोगाचे एकूण रक्कम जमा किती) किर्द खतावणी या कालवधीत एस.सी., एस.टी. वर ग्रामपंचायतने केलेला खर्च व शिल्लक रक्कम बँक पासबुकसह व जीएसटी बिले व त्याच्या नावे दिलेली चेकचा तपशिल मिळावी अशी मागितली होती. सदर माहिती अर्जाच्या संदर्भात दाखल उपरोक्त द्वितीय अपिलामध्ये आयोगाने दिनांक ११/१२/२०२४ रोजी सुनावणीअंती खालीलप्रमाणे आदेश पारित केले होते.

"तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कुंझर ता.चाळीसगांव, जि.जळगांव यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा १५ दिवसांत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी."

२. उपरोक्त आदेशास अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कुंझर ता.चाळीसगांव, जि.जळगांव श्री.संदेश निकम यांनी आयोगाकडे अद्यापपर्यंत कोणताही लेखी खुलासा सादर केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे याप्रकरणी त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहित धरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कुंझर ता.चाळीसगांव, जि.जळगांव यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये शास्तीची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कुंझर ता.चाळीसगांव, जि.जळगांव श्री.संदेश पंजाबराव निकम यांच्याविरुध्द आयोगाच्या मते उपरोक्त विवेचनाच्या पार्श्वभूमीवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१) अन्वये रु.१०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार मात्र) शास्तीची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम गटविकास अधिकारी, पंचायत समिती, चाळीसगांव ता.चाळीसगांव, जि.जळगांव यांनी त्यांच्या वेतनातून समान २ मासिक हप्त्यांत कपात करुन सदर रकमेचा भरणा **"००७०, इतर प्रशासनिक सेवा,**

(०१) (१८) **माहितीचा अधिकार दंड व शुल्क (००७०-०७८९)"** या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही करावी व सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर त्याबाबत आयोगास अवगत करावे.

२) प्रस्तुत द्वितीय अपिल क्र.४०७६/२०२३/जळगांव अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

**( भूपेन्द्र गुरव )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :-

---

जावक क्र. ७८३३ — दिनांक :- 13 OCT 2025